मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

क्र: बीएमआरडीए/एमटीजी/२५.  : १४ सप्टेंबर, १९८२.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ३० मार्च १९८२ रोजी भरलेल्या पंचविसाव्या बैठकीच्या कार्यवृत्ताची इंग्रजी व मराठी प्रत सोबत पाठविली आहे.

कार्यवृत्तासंबंधी कोणतेही आक्षेप असल्यास कृपया सदस्यांनी ते कळवावेत अशी विनंती आहे.

श्री वि आसगांवकर

( श्र. वि. आसगांवकर )
सचिव,
कार्यकारी समिती.

प्रति :

सर्व सदस्य व कायम निमंत्रित.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी.

एचु: १३९८२.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan,
5th Floor, Bandra (East),
Bombay - 400 051.

No.BMRDA/MTG/25 14th September, 1982.

The minutes of the 25th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 30th March, 1982 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

S.V.Asgaonkar 14/9/82

( S. V.ASGAONKAR )
SECRETARY
EXECUTIVE COMMITTEE

To

All Members and Permanent Invitees.

The Officers of the B.M.R.D.A.

---------

(127)

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या पंचविसाव्या बैठकीचे कार्यवृत्त.

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ३० मार्च १९८२ [मंगळवार] |
| वेळ | : | सकाळी १० वाजतां. |
| स्थळ | : | समिती कक्ष, सहावा माळा, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. |

पुढील सदस्य उपस्थित होते :-

१] डॉ. बळीराम वा. हिरे, नगर विकास व मुं.म.प्र.वि.प्रा. मंत्री. ..... अध्यक्ष.

२] श्री. सी. ना. देसाई, नगर विकास व मुं.म.प्र.वि.प्रा. राज्य मंत्री. .... उपाध्यक्ष.

३] डॉ. अ. उ. मेमन, मुंबईचे महापौर. ..... उपाध्यक्ष.

४] श्री. एन्. के. बारिया, अध्यक्ष, सुधार समिती, मुंबई महानगरपालिका. ..... सदस्य.

५] श्री. ए. रा. कोपर्डे, नगरसेवक, मुंबई महानगरपालिका. ..... सदस्य.

६] श्री. छगन भुजबळ, नगरसेवक, मुंबई महानगरपालिका. ..... सदस्य.

७] श्री. भि. धो. झुटे, नगरसेवक, मुंबई महानगरपालिका. ..... सदस्य.

८] श्री. भा. ना. आडारकर, अध्यक्ष, वाहतूक व दळणवळण मंडळ, मुं.म.प्र.वि.प्रा. ..... सदस्य.

९] श्री. नौरी गोपाळकृष्ण मूर्ती, अध्यक्ष, जलसंपत्ती व्यवस्थापन मंडळ, मुं.म.प्र.वि.प्रा. .... सदस्य.

१०] श्री. द. म. सुकथनकर, आयुक्त, मुंबई महानगरपालिका. ..... सदस्य.

११] श्री. भा. कृ. हळवे, महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा. .....सदस्य-सचिव.

गणपूर्ती होऊ न शकल्याने बैठक स्थगित झाली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [ बैठकींचे कामकाज] विनियम १९७५ मधील नियम १२ खालील तरतूदीनुसार अर्ध्या तासानंतर सभा घेण्याचे ठरले.

-------------------xxxxxxxxxxxx-------------------

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अगोदर स्थगित झालेल्या पंचविसाव्या बैठकीचे कार्यवृत्त·

दिनांक : ३० मार्च १९८२ [ मंगळवार ]

वेळ : सकाळी १०·३० वाजता·

स्थळ : समिती कक्ष, सहावा माळा, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२·

बैठकीस उपस्थित राहिलेल्या सदस्यांच्या नावांची यादी सोबत जोडली आहे· [ जोडपत्र " अ " ]·

बैठकीच्या प्रारंभी, प्राधिकरणाचे एक विद्यमान सदस्य श्री·अण्णासाहेब पां·पाटील यांच्या दु:खद निधनाचा अध्यक्षानी उल्लेख केला· प्राधिकरणाचा सदस्य या नात्याने श्री· पाटील यानी बजावलेल्या सेवेचा गुणगौरव करणारा ठराव नंतर प्राधिकरणाने मंजूर केला [ जोडपत्र " ब " ]·

त्यानंतर, प्राधिकरणाच्या बैठकीत अध्यक्षानी भाषण केले· [भाषणाची प्रतिलिपी जोडपत्र " क " प्रमाणे आहे]·

त्यानंतर, कार्यसूचीवरील विषयांचा विचार करण्यात आला·

बाब क्र· १ खालील बैठकांची कार्यवृत्ते पक्की करणे :-

१] दि·१९ ऑक्टोबर १९८१ रोजी भरलेल्या चौविसाव्या बैठकीचे कार्यवृत्त·

२] दि·१९ ऑक्टोबर १९८१ रोजी भरलेल्या विशेष बैठकीचे कार्यवृत्त·

वरील दोन्ही बैठकांची कार्यवृत्ते पक्की करण्यांत आली·

बाब क्र·२ उपरिनिर्दिष्ट बैठकींच्या कार्यवृत्तांवर करण्यांत आलेली कृती·

या संदर्भात झालेल्या चर्चेत प्राधिकरणाच्या काही सदस्यानी खालील प्रमाणे आपले विचार व मुद्दे मांडले आणि चर्चेनंतर कार्यवृत्तांवरील कृतीची नोंद घेण्यांत आली :-

[१] वसईच्या ईशान्येस वळीव-गोखिवरे जवळील एका क्षेत्रात कुष्ट रुग्णांचे संकेंद्रण (Concentration) झाल्याच्या प्रश्नावर विस्ताराने चर्चा झाली· चर्चेचा उपसंहार करताना, पाण्याच्या माध्यमातून कुष्टरोगांचा संसर्ग होत नाही आणि

२/..........

त्यामुळे आम जनतेच्या आरोग्यास धोका निर्माण होत नाही असे जे मत आरोग्य सेवा संचालकानी मांडले आहे ते मुंबई प्राधिकरणाच्या अध्यक्षानी ग्राहय धरले व वरील भागातील कुष्टरुग्णांचे अन्यत्र स्थलांतर करणे शक्य होणार नाही किंवा तशी आवश्यकताही नसल्याचे अध्यक्षांनी प्रतिपादन केले·

[२] कर्जतच्या क्षेत्राचा हरित पट्टयात समावेश झाल्याने स्थानिक नागरिकाना तेथील जमिनीचा लघुउद्योग विकासासाठी वापर करण्यास मुभा नसल्याचे मत व्यक्त करण्यात आले· त्यामुळे कर्जतहून प्रतिदिन २ ते ३ हजार माणसे कामधंद्यासाठी मुंबईस येतात· कर्जतची जमीन हरित पट्टयात आरक्षित ठेवल्याने बाहेरील व्यक्तीOutsiders सदर जमीन तुलनात्मकदृष्टया कमी भावाने खरेदी करुन तिच्यावर शेतघरांचा बहाणा करुन घरे बांधतात· म्हणून कर्जतच्या बाबतीत सध्याचे धोरण बदलून तेथील जमिनीचा लघुउद्योगाकरिता वापर करण्याची मुभा देण्यात यावी, म्हणजे स्थानिक माणसाना तिथेच कामधंदा मिळून तेवढया प्रमाणात तरी मुंबईतील गर्दी कमी करण्याचे उद्दिष्ट सफल होऊ शकेल, अशी आग्रही सूचना करण्यात आली·

वरील संदर्भात असा खुलासा करण्यात आला की, जिल्हा परिषदेने तयार केलेल्या आणि शासनाची मान्यता लाभलेल्या विकास योजनेनुसारच कर्जत क्षेत्राचा हरित पट्टयात समावेश करण्यांत आलेला आहे· तथापि काही विशिष्ट अटींची पूर्तता केल्यास सदर हरित पट्टयातही लघु व सेवा उद्योग काढण्यास मुभा आहे· या बाबतीत,लघुउद्योग विकासासाठीची पैटाळलेली काही विशिष्ट प्रकरणे असतील तर ती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे विचारार्थ व आवश्यक कृतीसाठी पाठवावीत, असे सांगण्यात आले·

[३] कुर्ला येथे कल्पना टॉकीजजवळील जमिनीच्या बाबतीत शासनाने, महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये निर्गमित केलेल्या आदेशाच्या संदर्भात असे सांगण्यात आले की, सदर जमिनीची विमानतळाच्या विस्तारासाठी आवश्यकता आहे· सध्या त्या जमिनीवर अनधिकृत भंगार विक्रेते धंदा करीत असून विमानसंचालकांच्या आंतरराष्ट्रीय संघटनेने [ इंटरनॅशनल युनियन ऑफ पायलटस ] त्या गोष्टीस सातत्याने हरकत घेतली आहे·

वरील बाबतीत आदेश निर्गमित झालेला असला तरी शासन राजपत्रात सूचना प्रकाशित करणे वगैरे पुढील कारवाई केलेली नाही असे स्पष्टीकरण करण्यांत आले·

३/............

बाब क्र•३ वार्षिक कार्ये कार्यक्रम १९८२-८३•

भविष्यकाळात प्राधिकरणाच्या सदस्यांकडून सूचना मागवून भावी कार्ये-कार्यक्रम तयार करण्यात यावेत , असे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी सूचविले• ही सूचना मान्य करण्यात आली•

कळवा-तुर्भे लोहमार्ग धक्का बांधण्यासाठी सिडकोला कर्ज देता यावे म्हणून १९८२-८३ सालच्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु•४० लाखांची अतिरिक्त तरतूद करण्यासंबंधीची टिप्पणी वार्षिक कार्ये कार्यक्रमाच्या प्रतीसह सदस्याना देण्यात आली•

प्रस्तुत बाबीवर झालेल्या चर्चेत ज्या सदस्यानी भाग घेतला, त्यानी पुढील मुद्दे मांडले :-

[१] बृहन्मुंबईची पाण्याची नित्य वाढती गरज भागविण्याच्या दृष्टीने मध्य वैतरणा प्रकल्प मार्गी लागणे अत्यंत निकडीचे असतानाही या प्रकल्पाचा वार्षिक कार्ये कार्यक्रमात अंतर्भाव करण्यात आलेला नाही•

या संदर्भात असा खुलासा करण्यात आला की, सचिव, पाटबंधारे विभाग यानी सदर योजनेचा प्रकल्प तयार करून प्रशासनिक मान्यतेसाठी तो नगरविकास विभागास सादर केलेला आहे• प्रकल्पाच्या कार्यवाहीस लागणा-या निधीची शासन व/ किंवा बृहन्मुंबई महानगरपालिका यानी तरतूद करावयाची असल्याने वार्षिक कार्ये कार्यक्रमात या प्रकल्पाचा समावेश झालेला नाही• या प्रकल्पासाठी पुरेशा निधीची तरतूद करण्याच्या प्रश्नाची छाननी करण्याची विनंती नगरविकास सचिवाना करण्यात आली•

[२] हेटवणे व बोरगांव प्रकल्पांची शीघ्रतेने कार्यवाही करण्यात यावी असे सांगण्यात आले•

[३] वार्षिक कार्ये कार्यक्रमात काही प्रकल्पांचे कार्यारंभ व कार्यपूर्तीच्या तारखेसंबंधीचे संपूर्ण शेरे दिले नसल्याचे काही सदस्यानी निदर्शनास आणले• अशा त्रुटी भविष्यकाळात टाळण्यात याव्यात असे सुचविण्यात आले•

त्यानंतर पुढील ठराव मंजुर करण्यात आला :

ठराव क्र. २००.

" असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, [अ] कळवा-तुर्भे मालवाहू रेल्वे फाट्याच्या बांधकामासाठी सिडकोला कर्ज म्हणून देण्याकरिता १९८२-८३ सालच्या अर्थसंकल्पीय अंदाजात केलेल्या ४० लक्ष रुपयांच्या अतिरिक्त तरतुदीसह १९८२-८३ सालच्या वार्षिक कार्य कार्यक्रमाला त्यासोबतच्या बाब टिप्पणीसह मंजुरी देण्यात येत आहे आणि [ब] वार्षिक कार्य कार्यक्रमात अंतर्भूत केलेल्या योजनांच्या तपशीलाला मान्यता देण्यास स्थायी समितीला याव्दारे प्राधिकृत करण्यांत येत आहे."

बाब क्र.४ : वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज १९८२-८३

बाब टिप्पणी विचारात घेऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्रमांक २०१.

" असा ठराव मंजूर करण्यात येत आले की, वित्तीय वर्ष १९८२-८३ सालचा अर्थसंकल्प [ कळवा-तुर्भे मालवाहू रेल्वे फाट्याच्या बांधकामासाठी सिडकोला रु.४० लाख कर्ज रूपाने देण्याच्या अतिरिक्त तरतुदीसह] आणि महानगर प्राधिकरणाचे जमा आणि संवितरित रकमा दर्शविणारे १९८१-८२ सालचे सुधारित अंदाज मुंबई महानगर, प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम [२३]१ खाली मान्य करण्यात येत आहेत.

शिवाय असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण याव्दारे स्थायी समितीला, योजना, सर्वेक्षणे इ. बांधकामविषयक कार्यक्रमात समाविष्ट नसलेल्या आणि प्रत्येकी अंदाजे रु. १० लाखांपेक्षा अधिक खर्चाच्या नसलेल्या बाबींना मंजुरी देण्याचा आणि या मर्यादेपेक्षा अधिक नसलेला व मान्य अर्थसंकल्पात तरतूद न केलेला कोणताही खर्च करण्याचा अधिकार- अशा प्रकरणांचा अहवाल पुढील सभेत प्राधिकरणाला सादर करण्याच्या अटींवर देत आहे."

५/........

शिवाय असा ठराव करण्यात येत आहे की, संबंधित कार्यकारी मंडळाना सर्वेक्षणे आणि अन्वेषणांचा अंतर्भाव असलेल्या आणि अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेल्या योजनांचा तपशील मंजूर करण्याचा अधिकार देण्यात येत आहे.

शिवाय असा ठराव करण्यात येत आहे की, पदनिर्मितीस मंजुरी देण्यात सक्षम असलेल्या अधिकाऱ्यांना अर्थसंकल्पाच्या आस्थापना सूचीत समाविष्ट नसलेली पदे निर्माण करण्यास, त्या पदांचा खर्च अर्थसंकल्पातील कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते यासाठी केलेल्या एकूण तरतूदीतून भागविण्याच्या अटींवर प्राधिकृत करण्यांत येत आहे. "

याप्रसंगी, वांद्रे येथील ड्राईव्ह-इन-थिएटर जवळून काढल्या जाणाऱ्या संकल्पित पर्यायी रस्त्याच्या बाबतीत सदस्यांनी विचारपूस केली. वांद्रे-कुर्ला समूहाच्या " ई " ब्लॉकसाठी जलनिस्सारण वाहिन्या टाकणे सुकर व्हावे याकरिता तात्पुरता उपाय म्हणजे संकल्पित पर्यायी रस्ता असल्याचे स्पष्टीकरण करण्यात आले. परंतु तेथील रहिवाशांच्या हरकती विचारात घेऊन सदर रस्ता वळणाचे काम स्थगित करण्यात आले आहे व पर्यायी वळण काढण्याची बाब विचाराधीन आहे, असे सांगण्यात आले.

अध्यक्षांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

<u>जोडपत्रे</u> " अ " - "ब" - "क"

एन्पी/८२०९०८.

135

जोडपत्र " अ "

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची
स्थगित झालेली पंचविसावी बैठक.

दिनांक : ३० मार्च १९८२.

उपस्थित सदस्य

१. डॉ. बळीराम वा. हिरे, ..... अध्यक्ष.
नगर विकास मंत्री,

२. श्री. सी. ना. देसाई, ..... उपाध्यक्ष.
नगर विकास राज्य मंत्री.

३. डॉ. अ. उ. मेमन, ..... उपाध्यक्ष.
मुंबईचे महापौर.

४. श्री. एन्. के. बारिया,
अध्यक्ष, सुधार समिती,
मुंबई महानगरपालिका. ..... सदस्य.

५. श्री. ए. रा. कोपर्डे,
नगरसेवक, मुंबई महानगरपालिका. ..... सदस्य.

६. श्री. भि. धो. झुटे,
नगरसेवक, मुंबईमहानगरपालिका. ..... सदस्य.

७. श्री. वि. ग. धारप,
नगरसेवक, मुंबई महानगरपालिका. ..... सदस्य.

८. श्री. अ. वा. पाटील,
नगरसेवक, मुंबई महानगरपालिका. ..... सदस्य.

९. श्री. छगन भुजबळ,
नगरसेवक, मुंबई महानगरपालिका. ..... सदस्य.

१०. श्री. प्रल्हाद हि. अडवाणी,
अध्यक्ष, उल्हासनगर नगरपरिषद. ..... सदस्य.

११. श्री. युसूफ हाफीज,
विधानसभा सदस्य. ..... सदस्य.

१२. श्री. गौरीशंकर त्रिवेदी,
विधानसभा सदस्य. ..... सदस्य.

२/..............

१३· श्री· तु·ए· सुर्वे,
विधानसभा सदस्य· ..... सदस्य·

१४· श्री· द·म·सुकथनकर,
आयुक्त, मुंबई महानगरपालिका· ..... सदस्य·

१५· श्री· भा·ना·आडारकर,
अध्यक्ष, वाहतूक व दळणवळण मंडळ, ... सदस्य·
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण·

१६· श्री· नोरी गोपाळकृष्ण मूर्ती, अध्यक्ष,
जलसंपत्ती व्यवस्थापन मंडळ,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण·· सदस्य·

१७· श्री· भा·कृ·हळवे,
महानगर आयुक्त,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण·· सदस्य-सचिव·

नि मं त्रि त :

१] सचिव, नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन·

२] व्यवस्थापकीय संचालक,
सिडको·

जोडपत्र "ब"

एन्पी/८२०९०८·

जोडपत्र -'ब'

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची अगोदर स्थगित झालेली पंचविसावी बैठक.

दिनांक : ३० मार्च, १९८२ (मंगळवार)

ठ रा व

" मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सन्माननीय सदस्य श्री. अण्णासाहेब पां.पाटील यांचे दिनांक २३ मार्च १९८२ रोजी दुःखद निधन झाले. श्री.पाटील हे दिनांक ८ ऑगस्ट, १९८० पासून हयातीपर्यन्त या प्राधिकरणाचे सदस्य होते. या कालावधीत त्यांनी प्राधिकरणाच्या कारभारात आणि कामकाजात तन्मयतेने भाग घेतला. हे प्राधिकरण श्री.पाटील यांनी बजावलेल्या सेवेचा गुणगौरव करुन त्यांच्या दुःखद निधनाने फार मोठी हानी झाली असल्याचे नमूद करीत आहे."

-----

जोडपत्र -'क'

139

जोडपत्र-'क'

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची अगोदर
स्थगित झालेली पंचविसावी बैठक.

दिनांक : ३० मार्च, १९८२ (मंगळवार)

मानवीय अध्यक्षांचे भाषण

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या पंचविसाव्या व नवीन सरकार अधिकाररुढ झाल्यानंतर भरणाऱ्या या प्रथम बैठकीच्या निमित्ताने आपले स्वागत करण्यास मला अत्यानंद होत आहे. या प्राधिकरणाच्या रचनेत काही बदल झालेले असून या निमित्ताने प्राधिकरणाच्या पुढील नूतन सदस्यांचे मी स्वागत करीत आहे :

| अनु.क्र. | सदस्य | |
|---|---|---|
| १. | श्री.सी.ना.देसाई, | उपाध्यक्ष. |
| २. | डॉ.व्ही.सुब्रह्मण्यम्, वित्त मंत्री. | |
| ३. | प्रा.असीर शेख, महमंद इस्माईल, गृहनिर्माण मंत्री. | |
| ४. | श्री.एस्.सारथ, महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे. | |

२. या प्राधिकरणाचे सदस्य या नात्याने बहुमोल कामगिरी बजावलेल्या परंतु सध्या सदस्य नसलेल्या पुढील व्यक्तींचे या निमित्ताने मी आभार मानून ऋणनिर्देश करतो :-

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.रामराव वा.आदिक, | अध्यक्ष. |
| २) | श्री.चंद्रकांत त्रिपाठी, | उपाध्यक्ष. |
| ३) | श्रीमती ताराबाई वर्तक, | सदस्य. |
| ४) | श्री.जयंतराव टिळक, | " |
| ५) | श्री.जवाहरलाल दर्डा, | " |
| ६) | श्रीमती प्रमिलाबेन याज्ञिक, | " |
| ७) | श्री.ए.एन्.ठाकूर, | " |
| ८) | श्री.पी.जी कोशिबे, | " |
| ९) | श्री.एम्.व्ही.बसरुर | " |

३. प्राधिकरणाचे एक सदस्य श्री.वकार अहमद गुलाम महमद मोमीन यांची महाराष्ट्र राज्याचे वित्त, सिंचन, अन्न व नागरी पुरवठा आणि वक्फ खात्याचे उपमंत्री म्हणून नियुक्ती झाली आहे. त्यांचेही मी स्वागत करीत आहे.

....२/-

४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अनेकविध समस्यांना तोंड देऊन महत्वाच्या प्रकल्पांच्या बाबतीत काही प्रगती केलेली आहे, याची नोंद घेण्यास सदस्यांना आनंद होईल. अशा प्रकल्पांची एक संक्षिप्त अनुसूची आपल्या माहितीसाठी मी या प्रसंगी सादर करीत आहे.

(१) वांद्रे-कुर्ला समूह :

दक्षिण मुंबईतील वाढती दाटी रोखण्याकरिता आणि वांद्रे-कुर्ला भागाच्या पर्यावरणांत सुधारणा करण्यासाठी वांद्रे-कुर्ला समूहाच्या ३७० हेक्टर क्षेत्रांत विकास कामे सुरु करण्याचे नियोजन प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत. या प्रस्तावामध्ये माहीम खाडीत जलमार्ग खोदणे, माहीम खाडीवरील पांच पूलांचे मजबूतीकरण करणे आणि जमिनीचे पुन:प्रापण करणे या विकास कामांचा समावेश आहे. इतर पांच पूलांपैकी तीन पूल बळकट करण्याचे काम यापूर्वीच सुरु झाले आहे. इतर दोन पुलांच्या मजबूतीकरणाचे काम येत्या ऑक्टोबर १९८२ पर्यन्त हाती घेण्यात येईल. पूल मजबूतीकरणाचे काम १९८४ पर्यन्त पूर्ण होणार असून त्यानंतर जलमार्ग खोदाई व पुन:प्रापणाचे काम व्यापक स्वरुपात हाती घेता येईल. संक्रमण काळात क्षेत्रीय अन्वेषणे, प्रयोग शालेय अभ्यास आणि खाडीतील प्रायोगिक स्वरुपातील उत्खनने यांच्या आधारे जलमार्ग खोदाईची कार्यपध्दती ठरविण्यांत येत आहे. सदर समूहाच्या 'ई' ब्लॉकमधील १२ हेक्टर क्षेत्राचे पुन:प्रापण करुन प्राधिकरणाने ते क्षेत्र यापूर्वीच विकसित केले आहे. १७ भू खंडांची विक्री झालेली असून त्यापैकी कांही प्लॉट्वर बांधकामे प्रगतीपथावर आहेत.

(२) वडाळा-अनिक ट्रक टर्मिनल :

वडाळा-अनिक येथे एक ट्रक टर्मिनल उभारण्याची प्राधिकरणाची योजना आहे. एकाहून अधिक प्रेषितासाठी(Consignees) मालाची वहातूक करणाऱ्या सर्व ट्रकना त्यांचा प्रवास या ट्रक टर्मिनलमध्ये समाप्त करावा लागेल. या टर्मिनलमुळे दक्षिण मुंबईतील परिहार्य ट्रक वहातुकीचे प्रमाण कमी होण्यास हातभार लागेल. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यांत जमिनीचे पुन:प्रापण करण्याचे काम नुकतेच सुरु झाले असून याच कामासाठीचे दुसरे कंत्राट मुंबई महानगर-पालिकेमार्फत देण्यात आल्यानंतर पुन:प्रापणाच्या कार्यास गती येईल अशी अपेक्षा आहे. उर्वरित जमीन संपादन करण्याच्या दृष्टीने करावयाची संबंधित कृती तसेच योग्य ते अधिकार असलेले एक ट्रक टर्मिनल प्राधिकरण स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक अशा प्रारुप अधिनियमाची चिकित्सा आदी कामाचाही पाठपुरावा करण्यात येत आहे. दरम्यानच्या काळात संकल्पित ट्रक टर्मिनलच्या जागेत नवीन

....3/-

अतिक्रमणे उद्‌भवणार नाहीत या दृष्टीने केलेले प्रयत्न यशस्वी झाले आहेत.

(३) न्हावा-शेवा बंदर प्रकल्प :

न्हावा-शेवा प्रकल्पासाठी एक तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मुंबई पोर्ट ट्रस्टने नियुक्त केलेले संमंत्रक मेसर्स होवे इंडिया लि. या कंपनीने सदर कामाचा तयार केलेला अंतिम अहवाल जानेवारी १९८२ मध्ये प्राप्त झाला. हा अहवाल भारत सरकार आणि मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्या विचाराधीन आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात पेटीबंद मालाच्या चढउतारासाठी ४ शायिका आणि अन्य प्रतीच्या मालाच्या चढउतारासाठी आणखी ४ शायिका बांधण्याची योजना असून या बांधकामास ५८० कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. न्हावा-शेवा बंदर प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामास १९८३ सालाच्या प्रारंभी सुरुवात होईल अशी अपेक्षा आहे. विद्यमान मुंबई शहरातील लोकसंख्येची दाटी कमी करण्यासाठी नवीन मुंबईचा विकास होणे अगत्याचे असून न्हावा-शेवा प्रकल्प कार्यान्वित होण्याने नवीन मुंबईच्या विकासाला गती मिळेल अशी अपेक्षा आहे.

(४) कळवा-तुर्भे मालवाहू रेल्वे फाटा :

नवीन मुंबईच्या विकासासाठी आणि विशेषत: तुर्भे येथील घाऊक कृषि उत्पन्न बाजार पेठांच्या समूहांची उभारणी विचारात घेता कळवा-तुर्भे मालवाहू रेल्वे फाटयाची नितांत आवश्यकता आहे. या रेल्वे फाटयासंबंधी तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता अभ्यास तसेच अंतिम स्थल निश्चयन सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वित्त सहाय्य दिले आहे. अंतिम स्थल निश्चयन सर्वेक्षणाचे काम सध्या अंतिम अवस्थेत असून हे काम एप्रिल १९८२ पर्यन्त पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. या मालवाहू रेल्वे फाटयाच्या कामासाठी (जिल्हा नियोजन विकास परिषदांनी करावयाच्या आर्थिक तरतुदीमधून) सहायक अनुदान रुपाने २ कोटी रुपये आणि पूरक कर्ज रुपाने आणखी २ कोटी रुपये सिडकोला देण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. आगामी १८ ते २४ महिन्याच्या काळात हा मालवाहू फाटा प्रत्यक्ष वापरासाठी तयार होईल, अशी अपेक्षा आहे.

(५) पूर्व-पश्चिम रेल्वे छन्नमार्ग :

नवीन मुंबईच्या वाढीला वेग मिळण्याच्या दृष्टीने तसेच दक्षिण मुंबईतील लोकसंख्येच्या सतत वाढत्या दाटीची तीव्रता कमी करण्याच्या दृष्टीने वडाळे-कुर्ला-मानखुर्द बेलापूर-पनवेल या रेषेत पूर्व-पश्चिम रेल्वे मार्गाची बांधणी

...४/-

करणे अत्यंत गरजेचे आहे. असे तत्संबंधीच्या अभ्यासातून आढळून आले आहे. चालू म्हणजे सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीतच या प्रकल्पाचे काम सुरु व्हावे म्हणून रेल्वे मंत्रालयाच्या संबंधित यंत्रणा/योजना मंडळ यांच्याशी सर्व स्तरावर प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यात येत आहे. या प्रकल्पास प्राधान्यक्रम देण्यात यावा या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विचार धारणेशी सर्व संबंधित प्राधिकारी यंत्रणा, मंत्रालये इत्यादींनी मतैक्य दर्शविले आहे. मुंबई महानगरातील पर्यावरणविषयक बाबींचा अभ्यास करण्यासाठी श्री.बी.बी.व्होरा यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या अभ्यास गटानेही पूर्व-पश्चिम रेल्वे छन्नमार्ग प्रकल्पावर विचार विमर्श केला आहे. सदर अभ्यास गटाचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नसला तरी प्रस्तुत प्रकल्पास अभ्यास गटाने अनुकूल मत दर्शविले असल्याचे समजते. निदान अंदाजे २५ कोटी रु.खर्चाच्या आणि त्याच्या बांधकामास ५ ते ६ वर्षे लागतील अशा ठाणे खाडीवरील लोह तथा रस्ता पूल-जो मानखुर्द बेलापूर या पूर्व-पश्चिम छन्न मार्गाचा अग्रक्रमी भाग आहे, त्याच्या बांधकामास त्वरीत सुरुवात करण्याच्या दृष्टीने करावयाच्या/अर्थोपायांचा विचार करीत आहोत. मानखुर्द-बेलापूर भागातून संकल्पित लोहमार्गाच्या भू-पट्टीतून जातो तिच्यावर बरीच अनधिकृत झोपडपट्टी फोफावली असल्याने त्यामुळेही या जमिनीच्या बाबतीत काही अंशी समस्या निर्माण झाली आहे. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संकल्पित रेल्वे मार्गाच्या संरेषेच्या आजूबाजूस कुंपण उभारुन सदर भू-पट्टीचे रक्षण करणे आदी बाबींवर विचार विमर्श करण्यात आला आहे. सद्यस्थितीत आम्ही सदर भू-पट्टीचे रक्षण [illegible] करणार असलो तरी मानखुर्दपासून ठाणे खाडीपर्यन्त रुळफाटा बसविण्याची विनंती आम्ही रेल्वे प्राधिकरणाला केली आहे. या कामासाठी २ कोटी रु.खर्च येईल. या खर्चाच्या रकमेत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सिडको, मुंबई महानगरपालिका आदी संस्था तात्पुरते अंशदान करतील अशी अपेक्षा आहे.

(६) <u>मुंबई महानगरातील निवारा कार्यक्रम</u> :

मुंबई महानगर प्रदेशात एक निवारा कार्यक्रम हाती घेण्याच्या दृष्टीने जागतिक बँकेचे वित्त सहाय्य मिळविण्याची शक्यता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सध्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या सहयोगाने अजमावीत आहे. या संदर्भात जागतिक बँकेच्या शिष्टमंडळाशी झालेल्या चर्चा विमर्शाच्या आधारे नियुक्त करण्यात आलेल्या एका बहुविध अभीकरण-कार्यकारी गटाने एक सर्वकष दस्तऐवज तयार केला आहे. अंदाजे २७८ कोटी रु.खर्चून

....५/-

कार्यवाही करावयाच्या या प्रकल्पामध्ये ८५००० भू-खंड आणि सर्व्हिस युनिट्स, १ लक्ष कुटुंबियासाठी गलिच्छ वस्त्यांची श्रेणीवाढ आणि मोडकळीस आलेल्या इमारतीत रहाणाऱ्या ३००० कुटुंबियांचे पुनर्वसन करण्याची तरतूद आहे. जागतिक बँकेच्या शिष्टमंडळाकडून या बाबतीत मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक आहे. जागतिक बँक सहाय्यभूत कार्यक्रमाला राज्य व भारत सरकारची मान्यता मिळविण्यासाठी गृहनिर्माण विभागाने आवश्यक ती पावले टाकली आहेत.

(७) कल्याण समूह क्षेत्रात एकात्मीकृत शहर स्तरीय बससेवा :

वरील प्रकल्पासंबंधी तपशीलवार व्यवहार्यता अभ्यास करण्याचे काम या प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील वहातूक व दळणवळण मंडळाने अलीकडेच पूर्ण केले. शहर स्तरीय एकात्मीकृत बस सेवा सुरु करण्याच्या दृष्टीने एक स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्यात यावे किंवा विद्यमान प्राधिकरणाचा विस्तार करण्यात यावा हा प्रश्न सध्या स्वतंत्रपणे विचाराधीन असला तरी सध्या अस्तित्वात असलेल्या परिवहन यंत्रणामार्फत कल्याण बस सेवा अभ्यासाची किमान पक्षी टप्याटप्याने कार्यवाही करण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न करण्यात आले. या प्रसंगी मला या गोष्टीचा निर्देश करण्यात आनंद वाटतो की, कल्याण समूह क्षेत्रात एकात्मीकृत बस सेवा सुरु करण्यासाठी शिफारस झालेल्या १५ बस मार्गापैकी ३ बस मार्गावर बससेवा सुरु करण्यास महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे मन वळविण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. या वर्षीच्या जानेवारी महिन्यापासून या तीन मार्गावर बस सेवा सुरु झाली. प्राधिकरणाचे वहातूक आणि दळणवळण मंडळ आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ लवकरच कार्यविषयक संनियंत्रणाच्या कामास प्रारंभ करणार आहे.

(८) मुंबई महानगर प्रदेशातील नगरपालिका परिषदांना वित्तीय व तांत्रिक सहाय्य.

मुंबई महानगर प्रदेशातील लहान नगरपालिका परिषदांना तोंड द्यावे लागत असलेल्या समस्यांची या प्राधिकरणास जाणीव असून अशा नगरपालिका परिषदांसाठी नागरी सुखसोयींच्या लघू योजना विकसित करण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अतिशय उत्सुक आहे. या वर्षी वसई नगरपालिका परिषदेत ११ लक्ष रुपये आणि खोपोली नगरपालिका परिषदेस १५ लक्ष रुपये एवढे वित्त सहाय्य क्षेत्र विकास योजनांच्या कार्यवाहीसाठी कर्ज रुपाने देण्यात आले.

....६/-

(९) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी कार्यालयीन इमारत.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यालयीन इमारतीसाठी वांद्रे-कुर्ला समूहातील पुनः प्रापित 'ई' ब्लॉकमधील भूखंड क्र.१४ आणि क्र.१५ हे निश्चित केले असल्याचे आपणास विदीत असेलच. कार्यालयीन इमारतीचे वास्तुशास्त्रीय अंतिम आराखडे पक्के बनविण्यात आले असून इमारतीच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागास अभिकरण म्हणून मुक्रर करण्यात आले आहे. सदर इमारतीच्या आर्‌सीसी संकल्पचित्राच्या कामातही बरीच प्रगती झाली आहे. इमारतीच्या भूमिगत पायाच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने यापूर्वीच निविदा मागविल्या असून सदर कामास लवकरच आरंभ होईल अशी अपेक्षा आहे.

(१०) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची पुनर्रचना

जागतिक बँकेच्या सूचनेनुसार नियुक्त करण्यात आलेल्या मेसर्स ए.एफ्.फर्ग्युसन अँड कंपनी या संमंत्रकांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे कार्य, रचना आणि संघटनात्मक बाबी यांचे पुनर्विलोकन केले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या रचनेत काही विशिष्ट फेरफार करण्याची शिफारस/सदर संमंत्रकांनी केली आहे. संमंत्रकाच्या अनेकविध शिफारशींचा अभ्यास करण्यासाठी राज्य शासनाने मुख्य सचिवांच्या नेतृत्वाखाली एका अभ्यास गटाची नियुक्ती केली होती. या अभ्यास गटाचा अहवाल सध्या शासनाच्या विचाराधीन आहे.

आता आपण कार्यसूचीतील बाबींवर विचार विमर्श करुया.

-----

# MINUTES OF THE 25TH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY.

DATE : 30th March, 1982 (Tuesday)

TIME : 10.00 A.M.

PLACE : Committee Room, 6th Floor, Mantralaya, Bombay-400 032.

The following Members were present :-

| | | |
|---|---|---|
| 1) | Dr. Baliram V. Hiray, Minister for Urban Development and B.M.R.D.A. | - Chairman. |
| 2) | Shri S.N. Desai, Minister of State for Urban Development and B.M.R.D.A. | - Vice-Chairman. |
| 3) | Dr. A.U. Memon, Mayor of Bombay. | - Vice-Chairman. |
| 4) | Shri N.K. Baria, Chairman, Improvements Committee, B.M.C. | - Member. |
| 5) | Shri E.R. Koparde, Councillor, B.M.C. | - Member. |
| 6) | Shri C.C. Bhujbal, Councillor, B.M.C. | - Member. |
| 7) | Shri B.D. Zute, Councillor, B.M.C. | - Member. |
| 8) | Shri B.N. Adarkar, Chairman, T&C Board, B.M.R.D.A. | - Member. |
| 9) | Shri N.G.K. Murti, Chairman, WRM Board, B.M.R.D.A. | - Member. |
| 10) | Shri D.M. Sukthankar, Municipal Commissioner, B.M.C. | - Member. |
| 11) | Shri B.K. Halve, Metropolitan Commissioner, B.M.R.D.A. | - Member-Secretary. |

As the quorum was not present, the meeting adjourned. As provided under Rule 11 of the BMRDA (Conduct of Business at Meetings) Regulations, 1975, it was decided to meet after half an hour.

$$$$$$$$$$$$$$$$$

ukd:24882

MINUTES OF THE ADJOURNED 25TH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 30th March, 1982 (Tuesday)

TIME : 10.30 A.M.

PLACE : Committee Room, 6th Floor, Mantralaya, Bombay-400 032.

A list of Members present is enclosed (Annexure 'A').

At the outset, the Chairman referred to the sad demise of Shri Annasaheb P. Patil, a sitting Member of the Authority. A resolution placing on record appreciation of services rendered by the late Shri Patil was then passed by the Authority (vide Annexure 'B').

The Chairman thereafter addressed the meeting (copy of the address is enclosed vide Annexure 'C').

The items of the Agenda were then taken up for consideration.

Item No. 1 : Confirmation of the minutes of -
i) the 24th meeting held on the 19th October, 1981;
ii) the Special Meeting held on the 29th October, 1981.

The minutes were confirmed.

Item No. 2 : Action taken on the minutes of the above meetings.

After discussion, in the course of which certain observations and points noted below were made by certain members, the action taken report was noted :-

(i) Issue regarding concentration of leprosy patients in an area to the north-east of Bassein near Valiv-Gokhiware was discussed at length. The Chairman, BMRDA, while concluding the discussion upheld the opinion given by the Director of Health Services to the effect that water is not the medium for transmission of leprosy and that there is no health hazard to the general public, and added that it would be neither possible nor necessary

to .....

to shift the above colony at any other site.

(ii) It was observed that the area of Karjat has been included in green belt and the local people are not allowed to develop the land for small-scale industries. As a result, daily 2000 to 3000 persons from Karjat come to Bombay for jobs. It was also observed that the land having been kept under green belt reservation is purchased at comparatively low price by the outsides, who build houses thereon under the guise of farm houses. It was, therefore, urged that the present policy in that respect be changed and the land in question be allowed to be developed for small-scale industries so that the local people would get job and to that extent objective of decongestion of Bombay might be achieved.

It was explained that as per the Development Plan prepared by the Zilla Parishad and approved by Government the area of Karjat has been included in green belt. However, small-scale and service industries are allowed in green belt provided certain conditions are fulfilled. Members were advised to refer specific cases to the BMRDA for consideration and necessary action, wherein permission for such development has been refused.

(iii) Referring to the directive issued by the Government, under Section 37 of the MRTP Act, in respect of the land near Kalpana Talkies at Kurla, it was observed that the land in question is required for expansion of the Aerodrome. Presently, unauthorised scrap dealers conduct their business on the land which was persistently objected by the International Union of Pilots.

It was explained that even though the directive was issued in this case, no further action, such as publication of a notice in Government Gazette, etc., has been taken.

<u>Item No. 3</u> : <u>Annual Works Programme 1982-83.</u>

The Chairman, BMRDA, suggested that in future Works Programme be prepared by inviting suggestions from the Members of the Authority. This was agreed to.

A note regarding creation of additional provision of Rs.40 lakhs in the Budget Estimates for 1982-83, as loan to

CIDCO .....

CIDCO for construction of Kalwa-Turbhe Goods Siding was circulated to the Members for consideration alongwith the Annual Works Programme.

During the course of discussion on this item, the Members participating in the discussion made the following points :-

(1) It was observed that in the Annual Works Programme, Middle Vaitarana Project was not included even though the project is badly required for meeting the increasing demand of water for Greater Bombay.

It was explained that the Secretary, Irrigation Department, had prepared the project and submitted the same to the Urban Development Department for according the administrative approval. Funds for the project will have to be provided by Government and/or Municipal Corporation of Greater Bombay and as such the project was not included in the Annual Works Programme. The Secretary, Urban Development Department was requested to sort out the issue regarding provision of requisite funds for the project.

(2) It was also observed that Hetawane and Borgaon Projects be expedited.

(3) Some Members pointed out that in the Annual Works Programme complete remarks regarding date of commencement and date of completion of some of the projects were not given. It was suggested that this shortcoming be avoided in future.

The following resolution was then passed :-

**RESOLUTION NO.200 :**

Resolved that (a) the Annual Works Programme for the year 1982-83 presented with the Item note, together with additional provision of Rs.40 lakhs (for the said year) as loan to CIDCO for construction of Kalwa-Turbhe Goods Siding, is approved and (b) the Standing Committee is hereby authorised to accord approval to the details of the schemes included in the Annual Works Programme.

Item No.4 : Annual .....

Item No. 4 : Annual Budget Estimates 1982-83.

The Authority after considering the Item Note, passed the following Resolution :-

RESOLUTION NO.201 :

Resolved that the Annual Budget Estimates in respect of the financial year 1982-83 (including additional provision of Rs.40 lakhs as loan to CIDCO for construction of Kalwa-Turbhe Goods Siding) and the Revised Estimates for 1981-82 showing estimated receipts and disbursements of the Metropolitan Authority, are approved under Section 23(1) of the BMRDA Act, 1974.

Resolved further that the Authority do hereby delegate the power to the Standing Committee to sanction schemes, surveys, etc. not included in the Works Programme, estimated to cost not more than Rs.10 lakhs in each case and to authorise the incurring of any expenditure not exceeding the same limit, in respect of which provision has not been made in the approved budget, subject to a report of such cases being made to the Authority at the next meeting.

Resolved further that the respective Functional Boards are authorised to sanction the details of the Schemes involving surveys and investigations for which provision has been made in the budget.

Resolved further that the authorities competent to sanction the creation of posts are authorised to create posts, which are not included in the establishment schedule of the budget; provided that the expenditure on such posts can be met from the total provision for salaries and allowances to the staff made in the budget.

At this stage, Members enquired about the proposed diversion of road near Drive-in-Theatre at Bandra. It was explained that the proposed diversion was to be provided as a temporary measure to facilitate laying of sewerage lines for 'E' Block of Bandra-Kurla Complex. However, taking into consideration the objections raised by the residents, the work of diversion had been suspended and that the alternative diversion was being thought of.

The meeting then concluded with a vote of thanks to the Chair.

-.-.-.-.-.-.-.-.-.-

ANNEXURE 'A' .....

(151)

ANNEXURE 'A'

## ADJOURNED TWENTY-FIFTH MEETING OF THE B.M.R.D.A.

DATE : 30th March, 1982.

MEMBERS PRESENT

| | | |
|---|---|---|
| 1) | Dr. Baliram W. Hirey, Minister for Urban Development. | Chairman. |
| 2) | Shri S.N. Desai, Minister of State for Urban Development. | Vice-Chairman. |
| 3) | Dr. A.U. Menon, Mayor of Bombay. | Vice-Chairman. |
| 4) | Shri N.K. Baria, Chairman, Improvements Committee, B.M.C. | Member. |
| 5) | Shri E.R. Koparde, Councillor, B.M.C. | Member. |
| 6) | Shri B.D. Zute, Councillor, B.M.C. | Member. |
| 7) | Shri V.G. Dharap, Councillor, B.M.C. | Member. |
| 8) | Shri A.W. Patil, Councillor, B.M.C. | Member. |
| 9) | Shri C.C. Bhujbal, Councillor, B.M.C. | Member. |
| 10) | Shri P.H. Advani, President, Ulhasnagar Municipal Council. | Member. |
| 11) | Shri Usuf Haffiz, M.L.A. | Member. |
| 12) | Shri G.S. Trivedi, M.L.A. | Member. |
| 13) | Shri T.E. Surve, M.L.A. | Member. |
| 14) | Shri D.M. Sukthankar, Municipal Commissioner. | Member. |
| 15) | Shri B.N. Adarkar, Chairman, T&C Board, B.M.R.D.A. | Member. |
| 16) | Shri N.G.K. Murti, Chairman, WRM Board, B.M.R.D.A. | Member. |
| 17) | Shri B.K. Halve, Metropolitan Commissioner, B.M.R.D.A. | Member-Secretary. |

INVITEES :

1) The Secretary to Govt. of Maharashtra, Urban Development Department.

2) The Managing Director, C.I.D.C.O.

-.-.-.-.-.-.-.-.-.-

ANNEXURE 'B' .....

ANNEXURE 'B'

ADJOURNED TWENTY-FIFTH MEETING OF THE

B.M.R.D.A.

DATE : 30th March, 1982 (Tuesday)

RESOLUTION

Shri Annasaheb P. Patil, Member of the Authority, has passed away on 23rd March, 1982. Shri Patil was a Member of the Authority during the period from 8th August '80 till his death. During this period he evinced a keen interest in the affairs and working of the Authority. The Authority wishes to place on record its appreciation of the services rendered by Shri Patil and also its deep sense of loss as a result of his sad demise.

-.-.-.-.-.-.-.-.-

ANNEXURE 'C'.....

ANNEXURE 'C'

## ADJOURNED TWENTY-FIFTH MEETING OF THE B.M.R.D.A.

DATE : 30th March, 1982 (Tuesday)

### SPEECH OF THE CHAIRMAN

I have great pleasure in welcoming you to this 25th meeting of the Authority and the first meeting since the new Government took over. Some changes have taken place in the composition of the Authority. I take this opportunity to welcome the following new Members of the Authority :-

| Sr.No. | Members | |
|---|---|---|
| 1. | Shri S.N. Desai. | Vice-Chairman. |
| 2. | Dr. V. Subramanian, Minister for Finance. | |
| 3. | Prof. Asser Shaikh Mohamed Ismail, Minister for Housing. | |
| 4. | Shri S. Sarath, General Manager, Western Railway. | |

2. I also take this opportunity to place on record the services rendered by the following persons who have ceased to be the members of the Authority :-

(1) Shri Ramrao W. Adik. - Chairman.
(2) Shri Chandrakant Tripathi. - Vice-Chairman.
(3) Smt. Tarabai Vartak.
(4) Shri Jayantrao Tilak.
(5) Shri Jawaharlal Darda.
(6) Smt. Pramilaben B. Yagnik.
(7) Shri A.N. Thakur.
(8) Shri P.G. Koshimbe.
(9) Shri M.V. Basrur.

3. I have also great pleasure in welcoming Shri Vakar Ahmed Gulam Mahmed Momin, a member of the Authority who has been appointed as Deputy Minister for Finance, Irrigation, Food and Civil Supplies and Aukaf.

4. I find .....

4. I find that despite numerous difficulties, the BMRDA has made some progress in the implementation of some important projects. I would like to take this opportunity to place a short list of these projects before you for information :

(1) Bandra-Kurla Complex :

With a view to restraining congestion in South Bombay and improving Bandra-Kurla environmentally, the planning proposals for the area of 370 Hectares in Bandra-Kurla Complex has been formulated. The project includes channelisation of Mahim Creek, strengthening of 5 bridges across the Mahim Creek and reclamation of the area. Out of 5 bridges, strengthening works on 3 bridges has already been started. Strengthening of remaining 2 bridges will be taken in hand by October 1982. The work of strengthening is expected to be completed by 1984 after which large scale channel cutting and reclamation works will start. In the meanwhile, methodology of channel cutting is being decided on the basis of field investigations, laboratory studies and experimental excavations in the creek. About 12 Hectares area has already been reclaimed and developed by the BMRDA from 'E' Block of the Complex. 17 plots have been sold and the building activities thereon is on the increase.

(2) Truck-Terminal at Wadala Anik :

It is proposed to establish a Truck-Terminal at Wadala Anik. Trucks carrying goods for more than one consignee will terminate at the proposed terminal which would reduce avoidable truck traffic in South Bombay. The work of reclamation of land in the first phase of the project has recently commenced and it is expected that the same will gather momentum with the award of another contract by the Bombay Municipal Corporation for the same. Associated actions for acquisition of the rest of the land, processing the necessary legislation for setting up the Truck Terminal Authority with suitable powers is being pursued. In the meanwhile efforts have successfully been made to ensure that the land required for the Truck-Terminal is kept free of any new encroachments.

(3) Nhava- ....

(3) Nhava-Sheva Port Project :

The final reports of the Consultants (M/s. Howe India Ltd.) appointed by the Bombay Port Trust for the preparation of Detailed Project Report for the Nhava-Sheva Project has been received in January 1982. The same is under consideration of the Bombay Port Trust and Government of India. The first stage of the Project with four berths for container and four berths for various trifle handling is expected to cost approximately Rs.580/- crores. It is hoped that the actual construction work may start in early 1983. Commissioning of this project is expected to give a big boost to the development of New Bombay Region which in turn is essential for reducing congestion in Bombay City.

(4) Kalwa-Turbhe Rail Goods Siding :

This project is essential for development of New Bombay and particularly the net complex of wholesale markets in agricultural commodities at Turbhe. BMRDA has financed Techno-Economic Feasibility Study as well as Final Location Survey. The latter is in final stage and is expected to be ready by April 1982. BMRDA has decided to give Rs.2/- crores as grant-in-aid (from the funds to be allotted by DPDCs) and further amount of Rs.2/- crores as bridging loan to the CIDCO for this project. It is expected that this Goods Siding will be ready for use within 18-24 months.

(5) East-West Corridor :

Studies have revealed that one of the vital necessities for accelerating growth of New Bombay and thereby contribute to the containment of congestion in Bombay City, is the East-West Corridor, along the alignment of Bandra-Kurla-Mankhurd-Belapur-Panvel. Efforts are being vigorously made, at all levels possible, to persuade Railway Authorities/Planning Commission to make a proper beginning to this project within the current i.e. Sixth Plan Period. All concerned authorities and ministries, etc., are in agreement with the BMRDA about the importance and priority of this

project .....

project. The Study Group on Environmental Issues on Development in B.M.R. under the Chairmanship of Shri B.B. Vora has considered this project and while their final report is not yet available, it is understood that the Study Group has reacted to this project favourably. We are considering ways and means of ensuring that atleast the Rail-cum-Road Bridge across the Thane Creek which would be essential for the first priority section of the East-West-Corridor viz. Mankhurd to Belapur, which is expected to cost approximately Rs.25/- crores and will take 5-6 years to be built, is commenced immediately. The land under the right of way of Mankhurd Belapur Section is posing a problem of encroachment by proliferation of unauthorised hutments. Various measures such as fencing, guarding, etc., have been considered. While it is proposed to guard the land presently, we have requested the Railway authorities to start with the work of laying tracks from Mankhurd upto Thane Creek. An amount of about Rs.2/- crores will be required for this work. BMRDA, CIDCO, BMC, etc., could contribute provisionally towards this amount.

(6) Shelter Programme in B.M.R. :

The BMRDA in collaboration with Maharashtra Housing and Area Development Authority and other agencies has been exploring the possibility of obtaining World Bank assistance for the shelter programme in B.M.R. A comprehensive document has been prepared by the Multi-Agency Working Group formed on the basis of discussion with the World Bank Mission. The programme envisaged would cost about Rs.278/- crores and cover 85,000 sites and services units, slum upgradation for one lakh families and rehabilitation of 3,000 families in dilapidated buildings. The response of the World Bank Mission has been very encouraging. The Housing Department is taking necessary steps to obtain the approval of the State and Central Government to this World Bank assisted programme.

(7) Integrated City Level Bus Services in the Kalyan Complex Area:

The Transport and Communications Board of the BMRDA has recently completed the detailed feasibility study of

the .....

157



the above project. While the question of setting up a separate authority or expanding the existing authorities for running such services is separately under consideration, efforts were made to commence implementation of Kalyan Bus Study atleast by phases, through the existing organisation. I am glad to report that we have succeeded in persuading the MSRTC to implement some of the recommendations regarding 3 out of the 15 recommended routes. These routes have started from January 1982. The Transport and Communications Board and the MSRTC will shortly undertake a post-implementation monitoring exercise.

(8) Financial and technical assistance to Municipal Councils in B.M.R.

BMRDA is very much keen in developing small urban nodes and is seized of problems of small municipal councils in the B.M.R. Technical advice and financial assistance are extended to small municipal councils. This year, financial assistance of Rs.11/- lacs (in the form of loan) has been given to Vasai Municipal Council and Rs.15/- lacs (as loan) to Khopoli Municipal Council for their Area Development Scheme.

(9) B.M.R.D.A. Office Building :

You are aware that Plots Nos.14 and 15 from 'E' Block reclamation in Bandra-Kurla Complex are earmarked for BMRDA's Office Building. Architectural drawings have been finalised and Public Works Department has been appointed as agency for execution of the work, R.C.C. Designing work has advanced substantially. Public Works Department has already invited tenders for pile foundation work of the building, which is expected to commence shortly.

(10) Reorganisation of BMRDA :

The functions, the constitution and the organisation of the Authority were reviewed by M/s. A.F.

Ferguson .....

Ferguson and Co. who were appointed as Consultants at the suggestion of World Bank. They have recommended certain changes in the constitution of the BMRDA. Government had also appointed a Study Group under the Chief Secretary to consider the various recommendations made by Consultants. The report of the Study Group is under Government's consideration.

We may now take up for consideration the business on the Agenda.

$$$$$$$$$$$$$$$$$$$$

ukd:25882